# रहे ना रहे हम- भाग ३१-३५

मी या कहाणीमध्ये केदारला व्हिलन करू शकते का? नक्कीच. त्यानं माझ्यावर प्रेम असल्याचं सांगितलं. लग्नाची आमिषं दाखवली. माझा उपभोग घेतला. नंतर वेळ आल्यावर मला सोडून घरच्यांच्या पसंतीनं लग्न केलं. वगैरे वगैरे! केदार टिपिकल व्हिलन कधीही होऊ शकतो. पण मी करणार नाही. कारण, मला त्याची बाजू माहित आहे. हे लग्न त्यानं मनाविरूद्ध केलं होतं. हे सर्व घडलं तेव्हा तो काही फार मोठा नव्हता. अवघा बावीशीचा तर होता. तसं अरेंज मॅरेजवाल्यांच्या दृष्टीने लग्नासाठी “जरा लवकरच”. त्यानं काय करणं अपेक्षित होतं? माझ्यासोबत पळून जाणं. घरच्यांसोबत भांडणं, घरच्यांशी संबंध तोडणं.... यापैकी काहीही केलं असतं तरीही आमचं लग्न झालंच असतं का? तो मला चल पळून जाऊ असं तीन चारदा म्हणाला. मीच नको म्हटलं. आईनं पळून जाऊन लग्न केलं होतं आणि वीस वर्षानंतरही तिला यावरून टोमणे ऐकावे लागत होते.

केदार स्वतःहून म्हणाला की त्याच्यामध्ये हिंमत नाही. पण हिमतीचा प्रश्न का येतो? त्यानं माझ्यावर प्रेम केलं.. मी त्याच्यावर प्रेम केलं. सिंपल. त्यासाठी आम्हाला इतकी यातायात का करावी लागली? आमचं लग्न होऊच नये म्ह्णून इतका आटापिटा का केला? आज कित्येक वर्षांनी मी जेव्हा कधी या संपूर्ण प्रकरणाचा विचार करते तेव्हा मला एकच कारण जाणवतं. इगो. केदारच्या घरामधल्या लोकांचा इगो दुखावला गेला होता. कारण त्यानं स्वतःहून लाईफ पार्टनर निवडली. ही त्याची सर्वात मोठी चूक. त्यानं मीच काय माझ्याऐवजी दुसरी कुठलीही सद्गुणी सुशील पोरगी आणली असती तरी तिला हेच ऐकावं लागलं असतं.. आमच्या लोकांचा ना एक प्रॉब्लेम असतो. आम्हाला आमच्या पोरांच्या आयुष्याचा प्रत्येक कोपरा हवा असतो. त्यापैकी लग्न हा तर सर्वात मोठा कोपरा. मुलाने स्वतःहून मुलगी निवडली की ती “वाईट्ट” असणार हे आम्ही आपलं आपण ठरवून मोकळे होतो. वयाच्या अडनिड्या कोपऱ्यावर त्याला कुणीतरी “आवडतं” तो धीर करून तिच्याशी बोलतो. ती त्याला प्रतिसाद देते, दोघं एकमेकांना आवडतात. जाणून घेतात. शरीराच्या, मनाच्या, भावनेच्या प्रत्येक पायरीवर एकमेकांच्या जवळ येतात. हळूहळू एकमेकांमध्ये गुंततात. भविष्याची स्वप्नं पाहू लागतात. एकमेकांच्या व्यक्तीमत्त्वामधले दोषसुद्धा त्यांना जाणवतात, पण ते दोष स्विकारण्याची मानसिकता त्यांची तयार होते. या सर्व क्रियाप्रक्रियांशी या लोकांना काही देणंघेणं नस्तं. त्यांच्या मते, तरूण पोरं प्रेमं करतात ते केवळ सेक्ससाठीच. सेक्स त्या वयात फार महत्त्वाचा असतो. नाही कोण म्हणतंय? पण अशावेळी ती मुलगी मात्र लगेच बदफैली होते. मुलगा “नादाला” लागतो. अरेंज मॅरेजमध्ये कसं सर्व काही सुरळीत समाजमान्य पद्धतीने. लग्नाच्या मांडवात एकमेकांना पाहिलेले नवरा बायको अजून

काही तासाभरातच एकमेकांच्या अंथरूणात असतात. आता त्या मुलीच्या गळ्यात मंगळसूत्र असतं त्यामुळे तिच्यासोबत त्याच मुलानं काहीही केलं तरी ते चालू शकतं. किंबहुना “काहीही” करावं हीच अपेक्षा असते. मग ते नवरा बायको स्वतः कितीका ऑकवर्ड असेनात का. सेक्सची क्रिया तीच, पण आता ती लफडेबाज नसते. “पवित्र” असते. दांभिकपणाच कळस असतो हे सर्व काही. हरतालिकेच्या नावानं उपास करायचा चांगला नवरा मिळावा म्हणून. पण त्या पार्वतीनं नवरा आपल्या मनानं निवडला होता याकडे मात्र सोयीस्कर डोळेझाक करायची.

केदारच्या बाबतीत हेच तर घडलं. त्यानं मुलगी निवडली हा राग सर्वात मूळचा. इतर सर्व त्यावर नुसती पुटं चढवलेली. अर्थात हे मला तेव्हा सुचलेलं शहाणपण नाही. आज कित्येक वर्षांनी विचार करताना जाणवतं. आता जाणवून तरी काय उपयोग आहे. तीर कमानसे निकल चुका. तसा मी फारसा केदारचा विचार करतच नाही. केला तरी त्या सर्व आठवणींचा पूर येतो.

अरिफने मृत्यूशी माझा परिचय करून दिला होता. केदारमुळे मृत्यूशी मैत्री झाली. मृत्यू काय असतो? शेवटचा श्वास घेणं? शरीराचं कुजणं? प्रेताची आग होणं? नाही, मृत्यु केवळ इतकाच नसतो. मृत्यू असतो आपल्याच मनामध्ये आपण मारून टाकलेलं कुणीतरी. मी मनातल्या मनात केदारला कितीतरीवेळा मारलं. प्रयत्न केला. कितीतरी दिवस मी स्वतःची समजूत घातली की केदार मेला. त्यानं मला धोका दिला नाही. मृत्यु त्याला ओढून घेऊन गेला. तो घरामध्ये असाच गप्पा मारत होता. अचानक चक्कर येऊन पडला आणि तो गेला. अगदीच अचानक. मी त्याच्या प्रेताला गेले होते. त्याची आईबाबा काकी काका सर्व खूप रडत होते. केदार तिरडीवर झोपला होता. मी त्याला बघून खूप रडले. आई मला सांभाळत होती तरी मी धाय मोकलून रडत होते. इतकी रडले की अखेर डोळ्यांतून वाहण्यासाठी अंगात पाणीच शिल्लक राहिलं नाही.

मग नंतर मला त्याचा कंटाळा आला. मग मी मनातल्या मनात दोन तीनदा त्याचा खून केला. मग तेही बोरींग झालं. मग मी सरळ केदारला परदेशांत पाठवलं. मग मी केदार आणि निधीचं अफेअर आहे असं मला समजलं म्हणून मी त्याला सोडलं असंही करून पाहिलं. मनाचे कितीही खेळ केले तरी सत्य परिस्थिती काही बदलत नव्हती.

केदारने केवळ मला सोडून दिलं नाही, तर त्यानं लग्नदेखील केलं. खरंतर त्याला जबरदस्तीनं करावं लागलं. वैद्यकशास्त्र सांगतं की तुम्ही शरीराच्या वेदना थोड्या दिवसांनी विसरून जाता. ती वेदनांची तीव्रता नंतर आठवत नाही. पण मानसिक वेदना मात्र कधीच तश्या नसतात. कितीही दिवसांनी, कितीही वर्षांनी जरी त्या आठवल्या तरी त्या तितक्याच तीव्र असतात. तसंच या केदारच्या आठवणींचं आहे.

केदारच्या लग्नाचं समजल्यापासून बाबा केवळ धुमसत होता. काहीही करून त्यानं हे लग्न मोडलं असतं. लग्न नाहीतर केदारचे हातपाय नक्कीच. मीच सांगितलं नको म्हणून. काय उपयोग होता? ज्या रात्री केदारने मला फोन केला तेव्हा तो कारवारकडच्या कुठल्यातरी मूळगावी होता. ही लग्नाची भानगड त्यांनी तिथंच निस्तरली. लग्न लावून जवळजवळ चार दिवसांनी ते सर्व जण गावात परत आले. हे सगळे दिवस मी घरामध्ये बसून काढले.  अजून काय करणार होते? रोज जादू भेटायला यायचा. असंच काहीतरी गाणी अथवा पिक्चरची डीव्हीडी द्यायला. आला की तासभर गप्पा मारायचा. माझं मन हलकं करण्यासाठी तो येतोय हे मला समजत होतं. पण दोन तीनदा त्यावरून त्याचं आणि नूरीचं भांडण झालं. नूरी त्याच्याशी भांडताना मुद्दाम किचनच्या कट्ट्य़ाजवळ उभं रहून ओरडायची. म्हणजे तो आवाज माझ्याही खोलीपर्यंत पोचायचा. मीच मग जादू आला की “मला बाहेर जायचंय” असं सांगून कार घेऊन जायला लागले.

कॉलेजच्या फर्स्ट इयरला असल्यापासून मी वजन कमी करायच्या मागे लागले होते. तशी लहानपणापासून गुबगुबीत होतेच, पण एफवायपर्यंत पारच जाड झाले होते. जिम आणि एक्सरसाईझ चालू केला होता, डायेटिंगचे असफल प्रयत्नही चालू होते. पण या महिन्याभरात मी कसलाही व्यायाम न करता दहा किलो वजन कमी केलं. डोक्यावरचे केस पातळ झाले. सहज केसांतून हात फिरवला तरी गुंताच्या गुंता हातात यायचा. आई बाबाला माझी फार चिंता होती. बाबा तर म्हणायला लागला चल, कुठंतारी फिरून येऊ. हिमालय नाहीतर दुबई सिंगापोर असं कुठंतरी लांब, मला कुठंही जायचं नव्हतंच.

मी केदारसाठी  रडत वगैरे होते का? तर नाही. मला एक गोष्ट समजली होती की आता केदार माझा राहिला नाही. केवळ लग्नामुळे आमचं नातं बदलत होतं का? माझ्या मनामध्ये एक प्रसंग मी कायम रंगवायचे. केदार परत आलाय. त्याचं लग्नं झालंय तरी तो परत आलाय. त्याचं अजून माझ्यावर किती प्रेम आहे तो सांगतोय. मीही त्याला तेच सांगतेय. “खड्ड्यात गेलं तुझं ते लग्न. आय डोंट केअर. तू अजूनही माझाच आहेस. माझाच राहशील. मी अशीच लग्नाशिवाय तुझ्यासोबत रहायला तयार आहे” पण मग तितक्यात केदारची बायको तिथं येते. मी तिला कधी पाहिलं नाही पण तिचा चेहरा सेम माझ्या आईसारखा. आणि आरश्यामधलं माझं प्रतिबिंब् थेट त्या काळ्यासावळ्या संध्यासारखं. मी चिडून तो आरसाच फोडून टाकते.

मी आयुष्यात कधीही “दुसरी बाई” बनू शकले नसते. दुसऱ्याची कुठलीही वस्तू मला नको हवी होती. केदार चाप्टर मी माझ्यापुरता तरी संपवून टाकला. आईबाबाला माझी तडफड दिसत होती, समजतही

होती. पण त्यांना हे समजत नव्हतं की मी आता केदारसाठी झुरत नाहीये. इट्स ओव्हर. संपलंय ते सर्व काही.

डिग्रीचं फायनल आता पूर्ण करायचंच होतं. त्यानंतर काय...

रात्र रात्र झोप लागत नव्हती ती या विचारानेच. या दिवसांमध्ये मी स्वतःला खूप म्हणजे खूप प्रश्न विचारले. आपल्याला केवळ कुणाची तरी मिसेस इतकीच ओळख हवी आहे का? आपण काहीतरी केलंच पाहिजे. माझ्यासमोर भलीमोठी पोकळी होती, निर्वात होता. त्या पोकळीमध्ये मला माझं आयुष्य बसवायचं होतं. असंतसं अस्ताव्यस्त नाहीतर नीटपणे सुबक मांडून. केदारच्या लग्नाची तारीख उलटून चारपाच दिवस झाले असावेत. एके रात्री अकरा वाजता कुणीतरी माझ्या खोलीचं दार वाजवलं. मी कंप्युटरवर गेम खेळत बसले होते. समोर आफताब उभा होता.

“कशी आहेस?” त्यानं विचारलं. माझा एकंदरीत अवतार बघून तो बराच दचकलेला दिसत होता.

“ठिक, तू कसा काय आलास?”

“एक फोन सुद्धा केला नाहीस ना?” त्यानं दोन्ही हात पसरून माझ्या खांद्यावरून वेढून मला जवळ घेतलं. आमच्या इतक्या वर्षांच्या मैत्रीमध्ये पहिल्यांदाच आम्ही इतक्या जवळून एकमेकांना स्पर्श केला असेल. पण हा स्पर्श समजूतदारपणाचा होता. आश्वासकतेचा होता “आय कॅन अंडरस्टँड युअर पेन” हे सांगणारा हा स्पर्श होता. इतक्या घट्टपणे. पुढे आयुष्यामध्ये मी कितीतरी वेळा आफताबच्या मिठीत शिरले. पण याक्षणी त्याच्या स्पर्शात दिलासा आणि अनुभूती होती. त्यानं मला काही संगायची गरजच नव्हती. तो मला तसाच धरून कितीतरीवेळ उभा होता. माझ्या केसांमधून हलकेच हात फिरवत तो म्हणाला. “त्याच्याकडून सीरीयसली ही अपेक्षा नव्हती” मग तो म्हणाला.

“जे झालंय ते ऑलरेडी होऊन गेलंय. प्लीज. त्यावर आपण नको बोलूया.” मी त्याच्यापासून दूर होत म्हटलं. “अचानक कसा आलास?”

“सहज दोन दिवस सुट्टी मिळाली म्हणून आलो. थोडं इकडं भाईचं काम पण होतं.”

“ओके.” पुढं काय बोलावं ते त्याला सुचत नव्हतं. एरवी आफताब कधीही आला तरी पिटपिट बोलायचा, मला चिडवायचा, चेष्टा करायचा. आज मात्र तो शांतपणे केवळ माझ्याकडे बघत उभा होता.

दोन दिवसांनी आफताब परत गेला, जाताना केवळ मला एकदा हाक मारली. बाकी पूर्णवेळ तो घराबाहेरच होता. माझ्याशी फारसा बोललापण नाही. महिन्याभरानंतर कधीतरी तो माझं कॉलेज सुरू झाल्यावर एकाच दिवसासाठी आला.

केदार आठ दिवसांनी दुकानात रोज यायला लागला. बाबा दुकानांत असला की तो समोर यायचादेखील नाही. घाबरत होता किंवा कदाचित स्वतःचीच लाजदेखील वाटत असेल. पण शेवटी चुकून किती चुकवणार. अखेर स्वतःच एकदा बाबासमोर आला आणि “चुकलं. माफ करा” वगैरे काहीतरी बोलून गेला. “पुन्हा चुकूनही स्वप्नीलचं नाव घेऊ नकोस” असा दम बाबानं भरला. मी आधीच विनंती केली होती म्हणून त्यानं केदारवर हात उचलला नाही इतकंच.

पण हीच विनंती मी आफताबला केली नव्हती. गावी आला होता तेव्हा म्हणे, तो एकदा केदारच्या दुकानात गेला. आधी दोन शब्द हसून “कसा आहेस?” वगैरे काहीतरी बोलला आणि नंतर दुकानाबाहेर पडण्याआधी एकच खचकचून त्याच्या कानाखाली मारली.

केदारचा गाल सुजला पण तरी त्यानं मान वर करून परत आफताबकडे पाहिलं नाही अथवा स्वतः हात उचलला नाही.

--------

बाबानं मला एकदोनदा आडून विचारलं की मी कॉलेजसाठी मुंबईला गेलं तर मला आवडेल का? मुंबईला माझा काका होता. शिवाय बाबानं याच वर्षी पनवेलला एक नवीन फ्लॅट घेतला होता. आईनं तितक्याच स्पष्टपणे मला सांगितलं की मी दूर गेले तर तिला करमणार नाही. मला तरी आईबाबाशिवाय कुठं करमलं असतं.

कॉलेज चालू झालं म्हणण्यापेक्षा माझ्या मरणयातना पुन्हा एकदा चालू झाल्या. गेल्या दोन वर्षामध्ये मी आणि केदारनं आमचं नातं कधी लपवलं नव्हतं. आम्ही काय प्रोफेसरांच्या समोरून गळ्यात गळे घालून फिरलो नव्हतो. सेक्स वगैरे गोष्टी आम्ही आमच्यापुरत्याच ठेवल्या होत्या. तरीही लोकांना यांचं लफडं आहे हे समजलं की पुढची गणितं आपोआप जुळवता येतात. आम्ही या सर्वांमध्ये अभ्यासाकडे दुर्लक्ष केलंय अशातलाही भाग नव्हता. केदारला फायनलला फर्स्ट क्लास होता. मी तरी एस वायला चक्क डिस्टींक्शन मिळवलं होतं. तरीही निर्भीडपणे माझं नातं समोर ठेवण्याचे इतके गंभीर परिणाम होतील असं मला वाटलं नव्हतं. कॉलेजमध्ये अगदी अकरावीची टुल्ली पोरं पण मला बघून घाणेरड्या कमेंट्स मारायला लागली. जणू काही ही पोरगी अव्हलेबलच आहे असं प्रत्येक मुलाला वाटत होतं.

आमच्या वर्गात जाह्नवी म्हणून एक मुलगी होती. बारावीनंतर तिचं लग्न झालं पण महिन्याभरातच नवरा वारला. सासरची माणसं चांगली होती. त्यांनी जाह्नवीला पुढे शिकायला परवानगी दिली. या जाह्नवीची काळजी अख्खं कॉलेज घ्यायचं. अगदी तिनं असाईनमेंट केली नाही तरी तिला कुठलाही प्रोफेसर काही म्हणायचा नाही. कारण ती बिच्चारी होती. माझ्याच वर्गात राधा होती. तीपण लग्नानंतर शिक्षण पूर्ण करत होती. तिला सर्व मैत्रीणी फार मान द्यायच्या. "घरचं सर्व व्यवस्थित करून मग ती कॉलेजला येते." चुटपुट सणांसाठी ती रजा राहिली तरी तिचं प्रॅक्टिकल दुसऱ्या बॅचसोबत नंतर करवून घेतलं जायचं. जाह्नवी, राधा आणि मी. काय फरक होता. जाह्नवीचं लग्न केवळ नावापुरतं झालं होतं. महिन्याभरात तिला असा कितीसा नवरा कळणार होता. राधा सासुरवाशीण होती, तरी शिकत होती. पण तिचं प्राधान्य केवळ घराला आणि नवऱ्याला आधी होतं. मी? माझं केदारवर प्रेम होतं. आम्ही अजून लग्न केलं नव्हतं, तरी एकत्र होतो. या तिघींमध्ये मीच वाईट होते. फरक होता तो गळ्यामधल्या मंगळसूत्राचा आणि कपाळावरच्या कुंकवाचा. आय हॅड अन अफेअर आणि ते प्रक्ररण यशस्वी ठरलं नव्हतं.

केदारने मला "युज" करून मग सोडलं असंही काही लोकं म्हणाली. मी अर्थात त्याच्याशी कधीच सहमत नव्हते. जेव्हा सेक्समध्ये आम्ही दोघंही पुरेपूर एकत्र आनंद घेत होतो, तेव्हा तोच एकटा काही मला "युज" करत नव्हता, मग आता त्याला दोष का द्यायचा? काही लोकं असंही म्हणाले की, मी लग्नाआधीच सेक्स केल्याने केदारनं मला सोडलं. हेही काही खरं नाहीच. केदारने हे लग्न अतिशय मनाविरूद्ध केलं होतं हे मला चांगलंच माहित होतं. त्याच्या लग्नानंतर आईच्या एका मैत्रीणीने आम्हाला सर्व काही घडलेला किस्सा सांगितला. अक्षरशः केदारनं त्या मुलीच्या गळ्यांत मंगळसूत्र बांधेपर्यंत त्याचे घरवाले त्याच्या आजूबाजूला बॉडीगार्डसारखे उभे होते. लग्न लावल्यानंतर त्याच्या आईनं पाण्याचा पहिला घोट घेतला. केदारसाठी ही सर्व जबरदस्ती होती. आपल्या घरचे इमोशनल ब्लॅकमेलिंग करत आहेत हे त्याला चांगलंच माहित होतं. लग्नानंतरही त्यानं त्या मुलीसोबत कसलेही संबंध जाऊदेत अगदी बोलायलाही नकार दिला होता. एकाच घरामध्ये असूनही केदार तिच्यापासून दूर रहायचा. आईला वडलांना, काकाकाकीला वाट्टेल ते बोलून दाखवायचा. वर्षभरात घटस्फ़ोट देईन असंही म्हणायचा वगैरे. आई कायम शेजाऱ्यांविषयी अथवा आमच्या काही नातेवाईकांविषयी असले काही किस्से सांगताना  जितक्या निर्विकारपणे मी ऐकायचे तितक्याच निर्विकारपणे मी हा किस्सा ऐकला. घटस्फोट काही झालाच नाही. पुढे काही वर्षांनी केदारला त्याच पत्नीकडून मुलगा झाल्याचंही समजलं तेही तितक्याच निर्विकारपणे मी ऐकलं. एका क्षणासाठीही मला तेव्हा वाईट वाटलं नाही. इर्ष्या वाटली नाही. जे झालं ते झालं. खूप वर्षांनी ते फेसबूकवर गेम अस्तात ना तशाच

एका “व्हॉट इज सुपरपॉवर” वाल्या गेमवर तो बावा मला म्हणे “युयर सुपरपॉवर इज विस्डम” म्हटलं पूर्णपणे गंडलास. माझी सुपरपॉवर असलीच तर ती विसरण्याची आहे. मी काही गोष्टी साफ विसरते. याही प्रकरणामध्ये मी महत्त्वाचा व्हिलन कोण आहे ते पूर्णपणे विसरून गेले होते.

असंच एकदा वैतागले होते तेव्हा जादू मला सहज म्हणाला. “वेळेचा प्रश्न असतो गं. जसा काळ जातो तसं सर्व काही धूसर होतं. आठवणीसुद्धा.”

“तू अश्विनीला असाच विसरलास?”

“क्कोण? ओह. अश्विनी.” तो जरा हसला. “असाच विसरलो. किती वर्षं झाली कुणास ठाऊक. त्या दिवशी जेव्हा समजलं तेव्हा तुझी आता जी हालत आहे तीच माझी झाली होती पण आता तिचा चेहराही नीट आठवत नाही...”

साहित्य संस्कृती

“खोटं बोलतोयस. अशा आठवणी डीलीट करता आल्या अस्त्या तर बरं झालं अस्तं ना?”

“पण मग जगायची मजाच कसली? आठवणी तर आपल्याला जिवंत ठेवतात. खरं सांगू? आठवणी डीलीट करायच्याच नाहीत. त्या एकतर कंट्रोल डीलीट करायच्या शक्य असेल तर नाहीतर सरळ हिडन फोल्डरमध्ये नेऊन ठेवायच्या. असा हिडन फोल्डर जो आपल्यालाही कधी सापडणार नाही.”

“मला आयुष्यात कधीही शक्य होणार नाही.”

“अजून पाच वर्षांनी मी हाच प्रश्न तुला विचारेन. तेव्हा उत्तर दे. पण आता माझं सर्वात महत्त्वाचं काम कर.” त्यानं खिशामधून एक व्हिजिटींग कार्ड काढून माझ्या हातात दिलं. “कसं आहे डीझाईन?”

“हे काये? उर्दूत लिहिलंय”

“पलटून बघ”

पलटलं तर त्यावर “अरिफ इलेक्ट्रीकल्स” असं मराठी आणि इंग्लिशमध्ये लिहिलं होतं. खाली जादूचा नंबर पत्ता वगैरे.

“नवीन बिझनेस चालू करतोय. इलेक्ट्रीकल फिटींगचा. त्याचीच सर्व धावपळ गेली महिनाभर चालू होती. आफताबने रजिस्ट्रेशन वगैरेसाठी खूप मदत केली.. आणि हे कार्ड अजून फायनल केलं नाही. तुझा जरा डीझाईनचा सेन्स चांगला आहे म्हणून तुला विचारतोय. काही चेंजेस हवेत का?”

“कार्ड छानच आहे, पण उर्दूमध्ये कशाला?”

“असंच. मला छान वाटतं शिवाय या गावात तसा मी नवीनच आहे, अम्मीच्या नातेवाईकांपैकी थोडेफार लोकं ओळखतात आणी नूरीचे माहेरवाले. त्यामुळे कसं जरा बिरादरीमध्ये अपनापन येईल ना? म्हणून.” माझ्या चेहऱ्यावरचे भाव बघून तोही एकदम बावरला. “माझी नाहीय...ही आफताबची आयडीया आहे. त्यानंच सांगितलं. उर्दू, देवनागरी आणि रोमन अशा तीन स्क्रीप्टमध्ये नाव लिहायचं” ते ऐकून मला फार हसू आलं. हे असे इतके मायन्युट डीटेल आफताबच सांगू शकतो. आमच्यासारखे सामान्य लोकं मराठी इंग्लिश उर्दू म्हणून मोकळे झाले अस्ते.

“आपल्याच घरामध्ये एक खोली ऑफिस म्हणून चालू करतोय. बाकी बराच वेळ साईटवर जाईल. ओपनिंग फार आधी करणार होतो. पण तुझे हे सर्व प्रॉब्लेम्स चालू होते.. म्हणून म्हटलं निवांतच करू या. जून फर्स्ट वीकमध्ये करूया?”

“माझ्या प्रॉब्लेममुळे तू का थांबलास. आफ्टर ऑल तुझा बिझनेस आहे....” जादू काही न बोलता हसत उठला. त्यानं मला सांगितलं नसलं तरी थोड्या दिवसांनी आफताबने सांगितलं. जादूला नवीन बिझनेससाठी बाबानं पैसे दिले होते. जास्त नाही, जितके कमी पडत होते तितकेच. पण नंतर जादूनं कधीही ते पैसे परत करायचा प्रयत्न केला तेव्हा बाबानं ते घेतले नाहीत. “कधी मला गरज लागली तर तुझ्याकडून हक्कानं घेईन” असं त्याला म्हणायचा. बाबाचा एरवी मला फार राग येतो. पण त्याच्याबद्दल असं काही आठवलं ना की फार अभिमानही वाटतो.

थर्ड इयर म्हणजे स्पेशलायझेशनचं वर्ष. माझ्यासमोर झूलॉजी किम्वा बॉटनी असे दोन पर्याय होते. मी बॉटनी निवडला. कारण केदारचं झूलॉजी होतं म्हणून मी आधी तेच करणार होते. पण आता परिस्थिती बदलली होती, सर्वच ऑप्शनचा सुरूवातीपासून विचार करणं गरजेचं होतं.

मला तसंही बॉटनी आवडायचं. फिजिक्स केमिस्ट्री बरोबर माझी यारीदोस्ती कधी झालीच नाही. बॉटनीमधली झाडंपानंफळंफुलं आवडायची. पण त्याहून आवडायची ती सेल बायोलॉजी. शरीराचं काय झाडांचं काय प्रत्येक अवयव, प्रत्येक भाग डोळ्यांना जसा आणि जितका दिसतो तो बाजूला करायचा. आपली दृष्टी अधिकाधिक सूक्ष्म करत जायचं आणि पोचायचं एकेका पेशींपर्यंत. जीवनाचा असलेला सर्वात बेसिक सोर्स. त्याही सोर्समध्ये असलेले भाग न्याहाळायचे. पेशींना दु:खं होतात का? पेशींना आनंद जाणवतो का? आपण सर्व बनलोय या पेशींपासून. मग एकेका सूट्या सुट्या पेशींना नक्की काय अस्तित्व असतं. या बेसिक युनिट ऑफ लाईफ पासून आपण तयार होतो. मग आपण नक्की कोण आहोत? अर्थात हे प्रश्न काही अभ्यासक्रमामधले नव्हेत. असंच मला रिकामं बसलं की पडणारे प्रश्न. त्यांना फारस काही अर्थ नाही.

सेल् बायोलॉजीचं प्रॅक्टीकल माझ्या कायम आवडीचं. बाकीच्या मुली कुरकुरायच्या, त्या मायक्रोस्कोपमध्ये डोळे घालून डोकं दुखतं, कंबर अवघडते. मला तसं कधी वाटायचं नाही. उलट कितीही वेळ मी त्या मायक्रोस्कोपखाली दिसणाऱ्या पेशींना मी पाहत बसले असते. दिस इज वंडरफुल. माझ्या शरीरामध्येही अशाच पेशी आहेत. लाखो करोडो, मोजताही येणार नाहीत इतक्या. या सर्व पेशी “स्वतंत्र” आहेत. त्यांना त्यांचं जीवनमान आहे, आयुष्य आहे, जन्म आहे मृत्यू आहे. या सर्व पेशींचा समुच्चय म्हणजे मी. मग स्वतंत्र कोण? मी की पेशी?

त्या दिवशी ओनियन रूट टिपचं प्रॅक्टीकल होतं. फर्स्ट इयरपासूनच माझ्या स्लाईड्स कायम चांगल्या बनायच्या. पण त्याबद्दल माझं कधी प्रोफेसर लोकांनी फारसं कौतुक केलं नाही. मी वर्गामधल्या सर्वात हुशार मुलींच्या ग्रूपमधली नव्हते ना. खरंतर मी सध्या कुठल्याच ग्रूपमध्ये नव्हते. हुशार नाही. मठ्ठ नाही. मी सर्वसाधारण होते. माझ्याकडून माझ्या शिक्षकांना तशाही फार काही अपेक्षा नव्हत्या. त्या दिवशी मायटोसिसची प्रक्रिया अभ्यासायची होती. मायटोसिस या ना त्या रुपांत अकरावीपासून कुठेना कुठे भेटत आलेलाच होता.

पेशींच्या केंद्रामधला क्रोमोझोमचं रूपांतर दोन स्वतंत्र एकसारख्या क्रोमोझोममध्ये होतं आनि त्यांना स्वतःचं स्वतंत्र केंद्रक मिळतं. पण अकरावीला शिकलेला हा इतकुलासा मायटोसिस थर्ड इयरला फारच डीटेलमध्ये स्टडी करायचा होता. प्रोफेसर बाईंनी सांगितल्याबरहुकूम मी कांद्याच्या मुळाचा एक सेंमीचा तुकडा काढला. तो व्यवस्थित धुवून घेतला. त्यावर हायड्रोक्लोरिक ॲसिड घालून त्याला बारा मिनिटं वॉटर बाथमध्ये ठेवला. परत पाण्याने सर्व ॲसिड धुवून त्यावर फेलुजेन स्टेन घातला. यामुळे पेशींच्या डीएनएला कलर येतो. नंतर परत ते रूट धुवून त्याला मायक्रोस्कोप स्लाईडवर ठेवला. नंतर कव्हर टिप ठेवून किंचित ठेचून त्या मुळाचा पापुद्रा बनवला. मायक्रोस्कोप ॲडजस्ट करून पाहिलं तर माझी स्लाईड व्यवस्थित दिसत होती. मॅडम लॅबमध्ये इकडे तिकडे फिरत सर्वांच्या स्लाईड्स बघत होत्या. माझी स्लाईड बघून त्या म्हणाल्या. “व्हेरी गूड! लिसन क्लास! स्वप्निलची स्लाईड येऊन बघा. इथं सेलच्या सर्वच स्टेजेस अगदी क्लीअर दिसत आहेत” प्रॅक्टीकलच्या बॅचमधला प्रत्येकजण येऊन माझी स्लाईड बघून गेले. “स्लाईड कशी बनवायची ते स्वप्निलकडून शिकून घ्या. किती नीट नाजुकपणे तिनं हे काम केलंय बघा.” मॅडम सर्वांना म्हणाल्या.

मॅडमनी सांगितल्याप्रमाणे मी स्केचेस रेडी करून घेतली. आजचा दिवस खरंच खूप मस्त होता. जुलैचा रात्रभर पाऊस पडून गेलेला दिवस कसा प्रसन्न असतो. आमच्या तिसऱ्या मजल्यावरच्या बायोच्या लॅबमधून दूरवर असलेला समुद्र दिसायचा. करड्या रंगाचा समुद्र त्यावर करडं आकाश. मध्ये पसरलेलं हिरवंगच्च माळरान. थोड्या दिवसांनी श्रावण आला की त्या माळरानावर रंगीबेरंगी

फुलंच फुलं यायची. मॅडम वर्गामध्ये काहीबाही सांगत होत्या. कुणी लिहून घेत होतं. माझं मात्र तिकडे लक्षच नव्हतं. मी नजर परत मायक्रोस्कोपकडे वळवली. इवलाल्या त्या चिमुकल्या पेशी. यांचा आकार किती तर ०.७५ मिमी.  एका मिमीनेही कमी असणाया या पेशी बघण्यासाठी माझ्या नजरेपेक्षा हजारपटीने सूक्ष्म पाहू शकणारा मायक्रोस्कोप हवाच.

मी मायक्रोस्कोप ॲडजस्ट केला. डोळ्यांनाही न दिसणाऱ्या अशा पेशींमधले क्रोमोझोम्स. गुणसूत्रं. कुठल्याही जिवंत गोष्टीची सुरूवात जिथून होते ते हे क्रोमोझोम्स. आय वॉज वॉचिंग लाईफ. सजीवाला निर्जीव आणि निर्जीवाला सजीव बनवतात ती ही गुणसूत्रं. आणि माझ्या डोळ्यांसमोर या इवलाल्या अर्ध्या सेंमीच्या पापुद्र्यामधली क्रोमोझोम्स चक्क एकाचे दोन बनत होते. लाईफ मूव्ह्ज ऑन. जरी त्याला भविष्य नसलं तरीही... जीवन पुढे जात राहतं. किंबहुना भविष्याची पर्वा न करता ते पुढे जात राहतं. त्याच्या वेगाप्रमाणे. त्याच्या गतीने, त्याच्या कुवतीने. म्हणून तर सजीव जगतो. “जगणं” म्हणजे केवळ जगणंच असतं का? मी आयुष्याची वीस वर्षे जगली आहे. पण इतकी वर्षं जगताना अशा कित्येक अब्जो खरबो पेशी मेल्यात. यापुढेही मी जगेन ते या पेशींच्या जन्मानं पेशींच्या मृत्यूनं. अख्खं प्रॅक्टीकल संपेपर्यंत मी माझ्य स्लाईडमधले ते क्रोमोझोम्स बघत होते. एक विक्षिप्त आणि शांत वलय मनामध्ये तयार होत होतं.

जुलै महिन्याच्या त्या दुपारी लॅबमधून बाहेर पाहत असताना हलकेच पावसाला सुरूवात झाली तेव्हा मला जाणवलं’आपल्याला काय करायचंय.

मला जगायचंय ते मी स्वतंत्र अस्तित्व म्हणून. पण माझं आधीचं अस्तित्व पुसून न टाकता. एका पेशीच्या दोन पेशी होण्यासाठी आधीची पेशी मारावी लागत नाही. नवीन स्वप्निल तर जन्मली पाहिजे, पण जुनी स्वप्निल मरता कामा नये.

एमएससीला जायचा निर्णय असो किंवा चांगली नोकरी सोडून पीएचडी करायचा निर्णय असो, या सर्वांमागे जुलै महिन्यामधली ही दुपार आहे. त्या दृश्यानं मला माझं अस्तित्व शोधून दिलंय.

--------

“बहोत घुमाया आपने हमे! चले, आज हम आपको घुमाये” आफताब उगाचच अदबीनं झुकून मला म्हणाला. त्यानं नवीन कार घेतली होती. पैनपै वाचवून केलेली ही आयुष्यामधली सर्वात मोठी खरेदी. खरंतर अझरभाईचा बिझनेस अजून इतका पण नीट बसला नव्हता पण कायम बाईकवरून फिरायचा

म्हणून आफताबनं ही कार घेतली. घेताना “मला कार घ्यायचीच” असा हट्ट केला आणि घरी आणल्यावर मात्र, पुण्याच्या ट्राफिकमध्ये काय नीट चालवणार? त्यापेक्षा इथं गावातच राहू देत असा लकडा लावला. म्हणजे घेतली ती मुळातच अझरभाईसाठी...

पण स्वतःची कार हे त्याचं खूप आधीपासूनच स्वप्न होतं. मी सातवीत असताना आम्ही मारूती घेतली होती. तो आणि मी बारावीनंतर एकत्र त्याच कारवर ड्रायव्हिंग शिकलो. ती कार तर त्याच्या हातात एकदम रूळली होती. बाबापेक्षा जास्त त्यानं चालवली असेल. मी अजूनही बिचकत चालवायचे, पण आफताब एकदम प्रो होता.

चार दिवसांच्या सुट्टीला आलेला आफताब आज परत निघाला होता. आईनं केलेलं भाज्यांचं लोणचं त्याला देण्यासाठी मी गडग्यावरून उडी मारून आले होते. अझरभाई घरात नव्हता. नूरीभाभी किचनमध्ये काहीतरी करत होती. तिला इथं येऊन इतके दिवस झाले तरी ती माझ्याशी जास्त बोलायची नाही. मी तरी कशाला मुद्दाम बोलायला जाऊ! आफताबच्या इंटर्नशिपचे थोडेच दिवस शिल्लक राहिले होते. फायनलच्या परीक्षेआधी तो परत एकदा पुणं सोडून गावी अभ्यासाला येणार होता.

“चल, रहने दे. मला नवीन कारमधून अझरभाई फिरवेल” मीपण त्याला चिडवलं. नूरीभाभीच्या हातून किचनमध्ये ताट पडलं.

“भाभी, कुछ हेल्प चाहिये क्या?” आफताबनं बसल्या जागी ओरडून विचारलं. आतून काहीच आवाज आला नाही.

“मुद्दाम करतेय” माझ्याकडे वळून तो कुजबुजत्या आवाजांत म्हणाला. “कार घेतली ना, ते आवडलं नाही”

“त्यात न आवडण्यासारखं काय आहे? अझरभाईला फिरायला बरी पडेल.” मी पण आवाज कमी ठेवला.

“त्याची बहुतेक कामं खेड्यांतून आहेत. बाईकवर उन्हापावसांतून किती फिरणार? तर म्हणे उगाच खर्च केला. त्यापेक्षा तेवढेच पैसे घालून बाजारपेठेंत फ़्लॅट घेऊ”

“तिकडे कशाला?”

“इकडे सर्व हिंदू आहेत. आपल्यातलं कोणच नाही. तिला एकदम एकटं पडल्यासारखं होतं. भिती वाटते म्हणे.”

“उगाचच. काझी फॅमिली किती वर्षं राहतेय की”

मी शाळेत असताना कुठंतरी मशिद पाडली म्हणून आमच्या गावांत दंगे झाले होते तेव्हादेखील बाबा आणि शास्त्री आजोबांनी आमच्या परिसरामधल्या सर्वांच्या घरी जाऊन शांत रहायला सांगितलं होतं. काझी अंकल इथे नव्हते काझीआंटी आणि त्यांची तीन मुलं होती तरी त्यांना कसलाही त्रास झाला नाही. दोन वर्षांपूर्वी गुजरातमध्ये दंगे झाले तेव्हाही गावामध्ये कसलेही दंगे होऊ न देता सर्व काही सुरळीतपणे चालू होतं.असल्या ठिकाणी या नूरीला कसली भिती वाटतेय?

आम्ही पुढे काही बोलायच्या आधीच किचनमधून खाण्णकन काच फुटल्याचा जोरात आवाज आला. दोघंही धावतच किचनमध्ये गेलो तर मी आताच आणलेली लोणच्याची बाटली खाली पडून फुटली होती. ती बाटली मघाशी मी डायनिंग टेबलावर व्यवस्थित सरकवून ठेवली होती. “कैसे एकदम कोपरेपे रख्खे. मै जरा गलतीसे हाथ लगाया तो गिर गयी” ती आमचयवरच वसकत म्हणाली.

आईनं सकाळीच बाबाला आठवडा बाजारात पिटाळून कितीतरी भाज्या मागवल्या होत्या. त्या धुवून चिरून त्याचं लोणचं मुद्दाम घातलं होतं. आमच्यासाठी अगदी वाटीभरच बाजूला ठेवलं आणि उरलेलं सगळं तिनं आफताबसाठी दिलं होतं. पुण्यात तो आणि तीन  मित्र मिळून भाड्यानं राहत होते. जेवणासाठी त्यानं मेसचा डबा लावला होता, त्यामधली भाजी काहीवेळा खराब व्हायची म्हणून चवीसाठी आईनं केलेलं सगळं लोणचं आता फरशीवर पडून खराब झालं होतं. भरीसभर बाटली फुटल्याने त्यात काचा मिसळल्या होत्या.

“साफ तो करना होगा” नूरीभाभी वैतागून म्हणेपर्यंत आफताबनं हातात खराटा घेतला होता. “रहने दो भाभी, मै कर दू.” म्हणत त्यानं झाडायला सुरूवात पण केली. मला खरंतर इतकं वाईट वाटलं होतं. पण नूरीभाभीला विशेष काही वाटलं नव्हतं. आफताबनं सगळ्या काचा काढून फरशी साबणानं पुसून घेईपर्यंत ती हॉलमध्ये बसून सीरीयल बघत होती.

“आईला सांगते घरामध्ये आहे तितकं…”

“अजिबात नाही” आफताब माझ्यावर डोळे वटारून म्हणाला. “काकींनी इतक्या कौतुकानं केलं होतं ते असं वाया गेलं म्हणून सांगितलं तर त्यांना किती वाईट वाटेल. काहीच बोलू नकोस. असं समज की बरणी घेऊन मी पुण्याला गेलो. कुणालाही काही बोलू नकोस. तिला असा दुसऱ्याचा हिरमोड करायला फार आवडतं” मी एक क्षण आफताबकडे बघतच राहिले. इतका बदलला हा? दुसऱ्याचा इतका विचार त्याला करता येतोय?

“चुकून पडली असेल”

“स्वप्निल, टेबलावरची बरणी चुकून जमीनीवर पडेल? हात लागला तर जागच्या जागी कलंडेल. डायरेक्ट फरशीवर येऊन कशी फुटेल? कोपऱ्यावर ठेवली नव्हती हे मलाही माहित आहे. तिनं मुद्दाम केलंय. तिचा माझ्यावर फार राग आहे.”

“पण का? तू तर इथं नसतोस”

बोलत असताना आफताबनं कचरा पिशवीत भरून फेकला (गंमत म्हणजे पाचच मिनिटांपूर्वी जी वस्तू खायची होती ती लगेच आता कचरा बनली. अशावेळी मला अरिफची आठवण येतेच!)

“मी इथं असलो नसलो तरीही... स्वप्नील,” त्यानं मला अंगणातच थांबवलं, “ही बाई वेडी आहे. कंप्लीट सायको”

साहित्य संस्कृती
संस्कृती.कला.जाणिवा जोडणारा सेतू

“काहीही”

“आजवर कुणालाच बोललो नाही. पण भाई आणि हिच्यामध्ये सर्व काही आलबेल नाहीय. रोज दोघांची भांडणं होतात. भांडणं म्हणजे.. ही बोलत असते आणि भाई ऐकतो. चुकूनमाकून त्यानं काही उत्तर दिलंच तर ही अजूनच आरडाओरडा करते”

“आमच्याही घरी कधी ऐकू येतो. पण त्यात..”

“हे बघ,” त्यानं पाठी अंगणात वाळत घातलेले कपडे दाखवले. “माझ्या शॉट्‌र्स. इथं आलो की कायम अशा कापलेल्या असतात. तीच कापते. तिला मी थ्रीफ़ोर्थ घातलेल्या आवडत नाहीत. धर्माच्या विरूद्ध आहे म्हणते”

“क्काय्य? आफताब, तू काहीही बोलतोयस आता”

“मी खॊटं सांगतोय का? सीरीयसली, ती घरात सायकोसारखी वागते. आता तुझ्यासमोर लोणच्याची बरणी फोडली. हे माझे कपडे कापलेले दिसत नाहीत का? भाई व्हेज खातो म्हणून कित्येकदा त्याच्या भाजीत चिकनचे तुकडे टाकते. मी पाहिलंय. विचारलं की म्हणते गलतीसे गिर गया. भाई रोज नमाझ पढत नाही त्यावरून तर इतकी किटकिट करते. भाईला म्हणते हे घर विकून आपल्या एरियामध्ये जाऊन रहायचं. इथं राहिलं तर आपली मुलं पण तुमच्यासरखीच काफिर होतील”

“म्हणजे?”

“आम्ही फार रीलीजीयस नाहीये. नूरी एकदम कर्मठ आहे. घरामध्ये बऱ्याच गोष्टी तिला आवडत नाहीत. भाई तर तुला माहिताय, सगळ्यावरून ओवाळून टाकलेला आहे. फ्रायडेची नमाझ मुश्किलीने पढतो. तिला लवकर बाळ हवंय. लग्नाला दोन वर्षं झाली पण भाई म्हणतो की जोपर्यंत सर्व काही ठिक होत नाही तोपर्यंत नको. मग परत दोघांत वादावादी. आय गेस, भाईला हे लक्षात आलंय. तिचं वागणं, तिला मेंटली प्रॉब्लेम आहे ते, म्हणूनच तो बेबीसाठी...” आम्ही बोलत असतानाच काहीतरी कामाचं निमित्त काढून नूरी मागे अंगणात आली. ती अलेली बघून आफताब एकदम गप्प झाला. मी पण काहीच बोलले नाही. तरी तिला एकंदरीत तिच्यावरूनच विषय चालू असेल हे समजलं होतं. ती परत आत गेल्यावर मी म्हटलं. “शॉर्ट्स घालू नको! धर्माविरूद्ध आहे”

“डोण्ट आस्क, तिच्या मते, माझं सी ए शिकणं पण धर्माविरूद्ध आहे. तिच्या सांगण्यानुसार आम्ही वागलो ना तर कंप्लीट वेडे होऊ. भाईची तर हालत खराब करून ठेवली आहे. तुला माहित नाही. तो हल्ली रोज पितो.”

साहित्य संस्कृती

“तो उगाच सांगतोस. बाबासोबत महिन्यातून कधीतरी.”

“स्वीटहार्ट, माझ्या खोलीत त्यानं बाटल्या लपवल्यात. यतीनकाकासोबत प्यायला बसतात ते वेगळंच. हे घरात वेगळंच. त्यावरूनसुद्धा नूरी भडकते. प्यायलेला असेल तर त्याला बेडरूममध्ये येऊन देत नाही. म्हणून तो रोज पितो. कळ्ळं? लिसन, तिची चर्चा पुरे. संध्याकाळी रेडी रहा. आपण नवीन कार घेऊन फिरायला जाऊ”

“निधीपण येणारे?”

“निधी चारचौघांत माझ्यासोबत कुठे येते का? आज तर बिलकुल येणार नाही. तिची कायतरी एक्झाम आहे. त्यामुळे आज तू आणि मी. तू म्हणशील तिथं जाऊ. चालेल?”

“तुला रात्री परत पुण्याला जायचंय तेवढं लक्षात ठेव. खूप दूरवर नेऊ नकोस” त्या संध्याकाळी आम्ही गावाच्या जवळच फिरायला गेलो.

“तुला ड्राईव करायचंय?” परत येताना आफताबनं विचारलं.

“नको. तू मस्त चालवतोयस. नवीन कार असूनपण”

“कित्ती आळशी आहेस गं तू” त्यानं मला चिडवलं. “मला ना लहानपणापासून ड्रायवर व्हयचं होतं. गाड्यां तेव्हापासून आवडायच्या. आता फायनल झाली ना की मी हेवी व्हेइकलचं लायसन्स काढणार आहे”

“आफताब ‘ द ट्रक ड्रायव्हर!”

“इन्शा अल्लाह, तेही करून बघू.”

माझं फायनलचं वर्ष रडतखडतच सुरू झालं पण पहिलं सेमीस्टर संपायच्या आधीच मी माझ्या नवीन आयुष्यात कंफर्टेबल झाले होते. इतके दिवस कॉलेज इज इक्कल टू केदार असं समीकरण होतं ते बदलून कॉलेज इज इक्कल टू स्टडींग असं नवीन समीकरण रूजवून घेतलं. गौतमीच्या नोट्स झेरॉक्स करून घेणे आणि त्या वाचणे म्हणजे माझा अभ्यास असायचा. पण गेले महिनाभर मी गौतमीसोबत बसून नोट्स काढत होते. त्यासाठी चारपाच पुस्तकं लायब्ररीमध्ये बसून वाचायची, समजून घ्यायची वगैरे करताना मला आवडत होतं. आफताबला इतके दिवस बूकवर्म म्हणून चिडवायचे, पण आता जाणवलं की पुस्तकं खरंच तुम्हाला किती कंफर्ट देऊ शकतात. रिकामं बसलं की डोक्यामध्ये वेगवेगळ्या विचारांची गर्दी व्हायची, पुस्तकं वाचताना मात्र (भले ती अभ्यासाची असोत वा नसोत) ते सगळे विचार बाजूला काढून टाकल्यासारखे व्हायचं. आफताबनं मला एका कधी न ऐकलेल्या लेखकांचं पुस्तक वाचायला दिलं होतं. “वनवास” नावावरून मला हे फारच बोअर किम्वा रडकू पुस्तक असेल असं वाटलं होतं. पण काय पुस्तक होतं ते!! सहज काय आहे म्हणून बघयाला पहिलं पान उघडलं ते डायरेक्ट सगळं पुस्तक संपवून मगच उठले. दुपारी कधीतरी वाचायला लागले होते. तिन्हीसांज झाली तरी मी वाचतच होते. आयुष्यात मी पहिल्यांदाच एखादं पुस्तक असं सलग वाचलं होतं.

साधं सरळ आणि तरीही एकदम गुंगवून ठेवणारं लिखाण. केदारप्रकरण झाल्यानंतर मी इतरांसमोर खोटं खोटं कित्येकदा हसली असेन, पण माझ्या खोलीत बेडावर पालथं पडून उशीवर हात ठेवून ते पुस्तक वाचताना मी एकटीच अगदी खरंखुरं मनापासून हसले होते. नंतर झपाटल्यासारखी मी प्रकाश संतांची उरलेली तीन पुस्तकं मागवली आणि अशीच सलग वाचली. एका नवीनच निरागस पण खूप ओळखीच्या विश्वाची नव्यानं ओळख झाल्यासारखं वाटायला लागलं.

इतके दिवस कॉलेजमधल्या प्रोफेसरांसाठी मी “जस्ट अनदर गर्ल” होते. माझ्याकडून त्यांना तशाही काही अपेक्षा नव्हत्या, पण गेले काही दिवस मात्र माझं एकंदर प्रॅक्टीकलमधलं स्किल बघून मला “तू नंतर एमएस्सी का करत नाहीस?” असा सल्ला मला दिला होता. वेल, पुढे शिकायचंय हे मी कित्येक दिवस आधीच ठरवलं होतं. एम बी ए, मास कॉम, एम सी ए वगैरे अनेक मास्टर्स कोर्स करता येण्यासारखे होते. माझ्या आवडीचं म्हटलं तर फॅशन डीझायनिंग, ॲडव्हर्टायझिंग वगैरे कोर्सेसची माहितीपण मी काढायला सुरूवात केली होती. यापैकी कुठलाही कोर्स आमच्या गावात नव्हताच. म्हणजे पुढं शिकायचं झालं तर गावातच एम एस्सी करायची किंवा गाव सोडून पुण्यामुंबईला जायचं.

केदार प्रकरण झाल्यामुळे आईबाबा मला गावाबाहेर पाठवतील का याची मला खात्री नव्हती गावातच एम एस्सी करायचं म्हणजे “लग्न जमेपर्यंत शिकत राहणे” याचं एक  गोंडस नाव झालं असतं आणि तेच मला करायचं नव्हतं.

अखेर काहीतरी निर्णय घ्यावा लागणारच होता.

-------

“साला, ये रूम तो शुरू होनेसे पहलेही खतम हो गया” माझ्या बाजूला उभ्या असलेल्या लतिकाने ही सर्किटस्टाईल कमेंट असली भन्नाट केली की सर्वांना हसू आलंच.

“मेरेलिये ये रूम ठिक रहेगा” मी हसू ओसरल्यावर म्हटलं.

“पागल है क्या? कितना छोटा है. और एक बेड लगेगा तो लोकल के डिब्बे जैसी हालत होगी” कुणीतरी सीनीअर म्हणाली.

“पर यहापे तो एकही बेड है”

“जैसे ऍडमिशन बढेंगे. बेडभी बढेंगे” हे माझ्या लक्षातच आलं नव्हतं. हॉस्टेल या गोष्टीशी माझा आयुष्यात पहिल्यांदाच परिचय होत होता. आईला तर मी गाव सोडून जाऊच नये असं वाटत होतं. बाबा मात्र खुश होता. आधी म्हणाला की पनवेलचा फ्लॅट भाड्यानं दिलाय, तो रिकामा करून घेऊन तिथं रहा. मग मात्र आईनं तिचा स्टॅंड बदलला, एकटी राहणार असेल तर सरळ हॉस्टेलला राहू देत म्हणून. एंट्रन्समध्ये चांगले मार्क असल्यानं मला कॉलेज एकदम ठिक मिळालं. पण हॉस्टेलला सीट मात्र जास्त नव्हत्या, त्यामुळे तिथं नंबर लागला नाही. शेवटी साहिलने माझ्या चुलतभावानंच हे हॉस्टेल सुचवलं त्याची कुणी वर्गमैत्रीण इथेच राहत होती म्हणे. खरंतर हे वर्किंग वूमन्स हॉस्टेल होतं. पण पोस्टग्रॅज्युएट मुलींना ऍडमिशन मिळायची. शेवटी अख्खं हॉस्टेल फिरून झाल्यावर मला हवी तशी सिंगल अकोमोडेशनची रूम व्यवस्थित मिळणार नाही हे लक्षात आल्यावर मी ट्विन शेअरिंगची रूम घेतली. माझ्याच वर्गात शिकणारी लतिका माझी रूममेट झाली. आमच्या दोघींची लेक्चरस प्रॅक्टिकल सेम असल्याने एकत्र राहिलं की आम्हाला बरं पडलं असतं.

कॉलेज सुरू व्हायच्या आधी घर सोडून येताना मला कसंतरी झालं. मी आजवर याच गावात लहानाची मोठी झाले. बाकीची मुलं अगदी सुटीसाठी आजोळी जायचे, तसंही माझं कधी नव्हतं. मुंबईला काकाकाकूकडे आलं तरी जास्तीत जास्त चार दिवस राहणं व्हायचं. गाव सोडल्यास मला इतर

ठिकाणं केवळ टूरीस्ट डेस्टिनेशन म्हणूनच माहित. आता मात्र पहिल्यांदा मी मुंबईमध्ये एकटी राहणार होते.

नातेवाईकांनी, परिचितांनी तथाकथित हितचिंतकांनी मी पुढे शिकू नये यासाठी चिक्कार प्रयत्न केले. आईला काहीबाही सांगून किंवा खोटीनाटी भिती घालून झाली. पण मला माझ्या आईचं एकाबाबतीत फार कौतुक वाटलं, मी घर सोडून जाऊ नये असं तिला वाटत होतं, तरीही मी निर्णय घेतल्यानंतर मात्र तिनं मला खूप सपोर्ट केला. काकू मेडिकलचं सगळं शिक्षण हॉस्टेलमध्ये राहूनच शिकली होती, त्यामुळे हॉस्टेल या विषयावर तिची ऑथोरीटी आईनं मान्य केली. एरवी दोघीजणी महिन्यांतून एकदा फोनवर बोलतील. मी निघायच्या आधी पंधरा दिवस मात्र सकाळ संध्याकाळ फोनवर काहीबाही विचारणं-सुचवणं चालू होतं. साहिल मागच्याच वर्षी आय आयटी खडगपूरला गेला होता. बाबानं त्यालाही फोन करून हॉस्टेल बद्दल महिती विचारून घेतली.

बाबा काय खुश होता! मी बीएससीनंतर पुढे शिकणार या एका गोष्टीनेच त्याला खूप आनंद झाला. काहीही शिकले तरी चाललं असतं त्याला. हॉस्टेलवर जाण्याआधी मला नवीन मोबाईल गिफ़्ट मिळाला. तेव्हाचा साधाच नोकियाचा पीस होता, पण तरी तेव्हा मोबाईलचं काय अप्रूप होतं. ग्रॅज्युएशननंतर पूर्वीने एम बी ए साठी पुण्याला ॲडमिशन घेतली. निधीने पण एमसीएम करण्यासाठी पुण्यालाच ॲडमिशन घेतली. खरंतर तिला मुंबईमध्ये सहज ॲडमिशन मिळत होती, युनिव्हर्सिटीही बदलली नसती पण पुण्यामध्ये तिचे ते “परिचित” होते ना!!

नवीन कॉलेजला येण्याआधी मला खूप भिती वाटत होती. आईबाबाला सोडून राहिले नव्हतेच. त्यात परत एम एससीचा अभ्यास झेपेल की नाही याचीपण साशंकता होती. कॉलेज सुरू झाल्यावर लक्षात आलं की इतकंही घाबरायची गरज नाही. माझे बेसिक्स पक्के होते. आफताबमुळे अभ्यासाची एक शिस्त केव्हाच लागली होती, इतकं काही मला काम कठीण गेलं नसेल. तसे कॉलेजचा पहिला महिना तर मस्तीमध्येच गेला. फ्रेशर्स पार्टी नी काय! एकूणातच गावामधल्या कॉलेजात होतं तसं इथं फार अभ्यासू वातावरण नव्हतं, म्हणजे लेक्चर्स प्रॅक्टिकल वगैरे व्हायची, पण त्याला गांभीर्य जास्त नव्हतं. सर्वात मस्त गोष्ट म्हणजे एक अख्खा मजला भरून लायब्ररी होती, शिवाय भलंमोठं कॅंटीन. माझ्या ब्रेकफास्टची आणि रात्रीच्या जेवणाची सोय हॉस्टेलमध्ये होती, पण दुपारचं जेवण कॅंटीनमध्येच करावं लागणार होतं. इथं चांगले पंजाबी, चायनीझ वगैरे व्हरायटीज उपलब्ध होत्या. एकंदरीत माझी चंगळ झालीच असती, पण झाली नाही कारण माझी रूममेट लतिका होती.

लतिकाचे वडील सेंट्रल गव्हर्नमेंटमध्ये होते. त्यामुळे तिचे दहावीपर्यंतच शिक्षण वेगवेगळ्या राज्यांत प्रांतात झालं. ग्रॅज्युएशनसाठी ती दिल्लीला होती, पण पोस्ट ग्रॅज्युएशनसाठी मुद्दाम मुंबईला आली.

खरंतर तिचा उद्देश मॉडेलिंगमध्ये करीअर करण्याचा होता, पण घरी आईवडलांना सांगायची सोय नव्हती. म्हणून पुढे शिकणे असं कारण देऊन ती मुंबईला आली होती. वास्तविक तिला शेअरिंगमध्ये फ़्लॅटवर रहायचं होतं, पण आईवडलांना तिच्याबद्दल थोडीफार कल्पना असल्याने त्यांनी मुद्दाम हॉस्टेलला ठेवलं होतं. हॉस्टेलचे नियम तसे फार कडक होते. संध्याकाळी सातनंतर इन्फ़ॉर्म न करता बाहेर राहिलं की सरळ पालकांना फोन जायचा. त्यातही लतिका चाप्टरगिरी करायचीच. काही मॉडेलिंग एजन्सीमध्ये तिने फोटो पोर्टफ़ोलिओ वगैरे दिले होते. असा करीअर ऑप्शन असल्याने लतिका प्रचंड हेल्थ कॉन्शस होती हे सांगायला नकोच. इथेही गाड्याबरोबर नळ्याची यात्रा या नियमानं मलाही जबरदस्तीनं हेल्थ कॉन्शस बनाव् लागलं. साहजिकच आहे, हातामध्ये मस्त गरमगरम वडापाव असावा आणि आपण पहिला घास घेण्याआधीच लतिकाने वड्याला तेलामध्ये किती ट्रान्सफॅट्स असतात आणि त्याने स्किन कशी खराब होते त्यावर लेक्चर चालू करावं. क्या खाक मजा आयेगा उस वडापावका!!

लतिका रोज सकाळी साडेपाचला वॉकसाठी जायची. बरं जाताना गुपचुप आपली आपण जाईल तर नाही, मलाही उठवून चल म्हणायची. मला खरंतर डोळ्यांवर प्रचंड झोप असायची, तरीही पेंगत पेंगत मी तिच्यासोबत जायचे. तासभर चालून झालं की ती रीफ्रेशमेंट म्हणून कसलातरी आवळ्याकारल्याचा ज्युस प्यायची. मी तसलं काही पिण्याऐअवजी हॉस्टेलच्या मेसमध्ये नाश्ता कराय्चे.

“इतकं चालून आलीस त्या सर्व कॅलरीज वाया गेल्या. इतका तुपकट उपमा खाऊन” मी पहिला घास घेण्याआधी लतिका सुरू होणारच. आता मला तिचा इतका त्रास वाटत असतानाही मी एमएससीची दोन वर्षं तिच्याच सोबत का काढली असा प्रश्न तुम्हाला पडला तर आश्चर्य नाही. असल्या अनॉयिंग मैत्रीणी ठेवायची मला हौसच आहे. आधी ती निधी नंतर गौतमी मग लतिका, आम्ही खूप भांडलो पण मी कधीही रूम चेंज करवून घेतली नाही. लतिकाचा कित्येकदा राग यायचा, खाण्यापिण्यावरून ती टोमणे मारायची तेव्हा जरा जास्तच. पण लतिका केवळ तेवढीच नव्हती. फ्रेंड या शब्दाला साजेशी होती. कॉलेजच्या पहिल्या दोन तीन महिन्यांत मला खूपवेळा होमसिक वाटलं. कित्येकदा आईची खूपच आठवण यायची. रडावंसं वाटायचं पण रडू यायचं नाही. अशावेळी माझी फक्त चिडचिड होत रहायची. हॉस्टेलमध्ये आजही विचारलं तर वॉर्डन मॅडम सांगतील की मॅक्झिमम भांडणांचा रेकॉर्ड स्वप्निलचा आहे. मी प्रचंड हट्टी होते, माझं तेच खरं करायची मला सवय होती. त्यामुळे माझं कुणाशीच पटायचं नाही. अख्ख्या हॉस्टेलमध्ये मी तेव्हा प्रत्येकाशी भांडले होते. चूक माझीच असलीतरी लतिका माझीच बाजू घेऊन भांडायला उतरायची. पण नंतर रूममध्ये आल्यावर माझ्यावर बरसायची.

"किती चिडतेस? तिनं हात धुतले तर तुला काही प्रोब्लेम आहे का??"

"पण मी ब्रश करत होते ना? मग त्याच बेसिनमध्ये...."

"शेअर करायला शिक स्वप्निल. बेसिन तुझं एकटीचं नाहीये. तुझं ब्रश करून होइपर्यंत ती तशीच थांबली तर तिला ऑफिसला उशीर होणार नाही का? प्रत्येकाला घाई आहे. प्रत्येकाला बाहेर जायचंय" लतिका मला प्रेमानं समजवायची. कित्येकदा पटायचं, तर कित्येकदा नाही.

पण सर्वात जास्त मजा यायची ती माझं आणि लतिकाचं भांडण झालं की. आम्ही दोघी दिवसांतून चारदा तरी भांडायचोच. आमच्या वादावादीला कसलंही निमित्त पुरायचं. पण सर्वात जास्त भडका उडायचा तो कॉलेजला निघायच्या आधी!

गावामध्ये असताना आमचा ग्रूप सर्वात जास्त स्टायलिश मुलींचा होता. केदार तर कायम म्हणायचा, तुमचं अर्ध डिस्कशन "काय घालू" यावरच केंद्रित असतं. बाबा मी म्हणेन तो ड्रेस मागवून द्यायचा. अख्ख्या गावात कुणाकडे नसतील अशा फॅशनचे कपडे माझ्याकडे होते. पण मुंबईला आल्यावर लतिकाने हा फुगा फोडला, चांगली टोकदार टाचणी लावूनच.

"क्या फिल्मी फॅशन फॉलो करती है?" माझे बरेच ड्रेस बघून ती म्हणायची. "हे रंग तुला सूट होत नाहीत. ही स्टाईल तुला छान दिसत नाही. ही ऍक्सेसरी यावर अजिबात जात नाही. ही बॅग त्या ड्रेसवर किती रॉंग दिसतेय" अशा लतिकाच्या कमेंट्स चालू असायच्या. हॉस्टेलवर येऊन दोन महिने झाल्यानंतर मी तिच्यासोबतच शॉपिंग करायला लागले. तिनं माझा स्टाईल सेन्सच बदलला.

आता खरंतर कुणालाही असं वाटेल की मी गावामध्ये फार साधी वागणी वगैरे होते आणि मुंबईला येऊन एकदम डिवामटेरीअल झाले. बदल असे घडत नसतात.. घडले तर केवळ पिक्चरमध्ये. कपडे बदलले, हेअर कट बदलला, चष्मा जाऊन लेन्सेस घालायला सुरूवात केली फ़्लॅट हील्स जाऊन हाय हील्स आल्या म्हणून मी बदलले का? यापैकी कित्येक बदल गावामध्ये राहिले असते तरी घडलेच असते. घडतही होते. केदारसोबत मोडल्यानंतर थर्ड इयरला आल्यावर मी कॉलेजला जाताना मुद्दाम स्लीवलेस घालायचे. शाळा संपल्यानंतर स्कर्ट कधी वापरले नव्हते पण तेव्हा मुद्दाम स्कर्ट्स घालायला लागले. गुडघ्याइतके स्कर्ट्स् बघून आईपण वैतागायची, पण मी कुणाचं काही ऐकायच्या मूडमध्ये नव्हते. ही माझी स्वतःसोबतच केलेली बंडखोरी होती. पण मग मुंबईला आल्यावर नक्की काय बदललं? एक तर निर्णय घ्यायचं स्वातंत्र्य मला मिळालं. आणि दुसरं त्याहून महत्त्वाचं घेतलेल्या

निर्णयांची जबाबदारी घेण्याची अक्कल आली. हे बदल तसे दिसून येत नाहीत पण फार खोलवर रूजलेले असतात.

अगदी पहिले सहा महिने मी बाबाकडे अल्मोस्ट दर आठवड्याला पैसे मागायचे. आई मला फोनवरून ओरडलीसुद्धा. पैसा कसा खर्च व्हायचा तेच समजायचं नाही. बाबाकडे कधीही मागितले की वस्तू मिळायच्या, खाणंपिणं सर्व काही उपलब्ध असायचं. मी आजवर बाजारात जाऊन एकदाही भाजी आणली नव्ह्ती की फळं आणली नव्हती. पैसे मोजून खर्च करावेत असं कधी वाटलंच नाही. पण इथं आल्यावर लक्षात आलं की बऱ्याचदा कॅंटीनचं बिल आपणच देतोय. लतिका क्वचित देते, वास्तविक तिचा बाबा हा माझ्या बाबापेक्षा दुप्पट श्रीमंत होता, पण मी मूर्ख होते त्याचं काय? अखेर कधीतरी माझ्या लक्षात आलं की आपण थांबवणं तर गरजेचं आहे, पण लतिकाला दुखवायचं नव्हतं. मग सरतेशेवटी मी पर्समध्ये मोजूनच पैसे ठेवायला लागले. चव्वेचाळीस रूपयाचं बिल झालं की “इतनाही है मेरेपास” म्हणत मी पर्समधून वीसची नोट काढायचे मग उरलेले पैसे लतिका द्यायची. थोडीफार तरी अक्कल आली म्हणायची मला.

पण लतिका वाईट नव्हती, एके दिवशी सहज तासभर तिनं मला तिच्या प्रेमकहाण्या ऐकवल्या. याबाबतीत ही आफताबची बहीण शोभली असती. आतापर्यंत तिचे सात की आठ बॉयफ्रेंड झाले होते. नववा तर तिनं कॉलेजमध्ये आल्याआल्या पटवला होता.

“व्हॉट अबाऊट यु? तेरा कोइ बॉयफ्रेंड?” तिनं मला विचारलं.

“पागल है क्या? छोटेसा गांव है हमारा. उधर ऐसा कुछ नही चलता.  मैने गर्ल्स स्कूलमे पढाई की. आजतक कभी लडकोंसे बात भी नही की” मी सांगून टाकलं. खोटं बोलले असं नाही, पण मला माझं प्रेमप्रकरण इथं कुणाला सांगायचं नव्हतं, ज्या गोष्टीत आपण हारलोय ती काय इतरांना मिरवून दाखवायची बाब नव्हे. तसंही आधीच्या कॉलेजमध्ये काहीही लपवाछपवी न केल्याचे अनेक तोटे सहन केलेच होते. निधी वॉज राईट. या दुटप्पी समाजामध्ये नीट रहायचं असेल तर आपणही असंच दुटप्पी रहायला हवं.

फक्त हे असं सांगितल्याचा एकमेव तोटा असा झाला की अख्ख्या कॉलेजमध्ये मी फार साधीसरळ मुलगी असून अद्याप “काहीही न केल्याची” बातमी आपसूक पसरली. लतिकाच्या काही मित्रांनी म्हणे, माझ्या वर्जिनीटी घालवण्यावर पैजा मारल्या होत्या.

हे सर्व मी जेव्हा आफताबला फोनवर सांगितलं तेव्हा तो नुसता खदाखदा हसत होता.

--------

एमएससीचं पहिलं वर्ष केव्हा संपलं ते कळलंसुद्धा नाही. अगदी सुरूवातीला आईबाबाची फार आठवण यायची. मी आईवेडी किती होते. ते मला घर सोडल्यानंतर जाणवलं. लहान असताना आई मला फार बाहेर खेळायला सोडायची नाही. मला झेपत नाही वगैरे कारणं सांगून. तेव्हा बाबा दुपारी जेवायला घरी यायचा, आला की माझ्यासोबत व्हीडीओ गेम्स खेळायचा, पण तो घरी नसला की, आई माझ्यासोबत बसून बिझनेस, चेस, ल्युडो असे खेळ खेळायची. शाळेमध्ये मैत्रीणी होत्या, पण मैत्री फारशी कुणाहीसोबत नव्हती. कॉलेजसाठी घर सोडल्यावर सर्वात जास्त आईची आठवण यायची यात काही नवल नाहीच. मी रविवार एक दिवस सुट्टी असले तरी गावी जायचे. ट्रेनचा प्रवास आवडायचा नाही पण घरी आईला भेटायची ओढ होतीच. अधेमध्ये गेले तर काकूकडे जायचे, पण ती तिच्या कामामध्ये खूप बिझी असायची, तिच्या आणि काकाच्या ड्युटीवेळा पण वेगवेगळ्या असायच्या. त्यापेक्षा घरी गेलं की आई वाट बघत असायचीच. बाबाच अधूनमधून कधीतरी ओरडायचा, किती त्रास करवून घेतेस म्हणून. पण मला आईला बघितलं की प्रवासाचं काही वाटायचं नाही. परत निघताना बाबा दरवेळी म्हणायचा, ट्रेनमध्ये बसवून देतो, बसमधेय बसवतो. पण दरवेळी तो मुंबईपर्यंत सोडायला यायचाच.

“निल्या, प्रत्येक वीकेंडला असं यायचं नाही हां. अभ्यास कर. सुट्टीमध्ये महिनाभर यायचंच आहे” बाबा ओरडल्यासारखं करायचा. “मी तेव्हा तुला न्यायला येईन” तरी मी शनिवारी सकाळचं प्रॅक्टीकल संपलं की लेक्चर्स अटेंड करण्याऐवजी स्टेशनवर येऊन घरची ट्रेन पकडायचे. आमच्या गावाला जायला ट्रेनची फ्रीक्वेन्सी बरीच वाढली आहे हे एक बरं झालंय.

शनि रवि हॉस्टेलमध्ये फरसं नसलयने लतिका माझ्यावर एकदोनदा वैतागली. “क्या घर भागती रहती है. इस वीकेंड तूकही नही जायेगी. हम लोग इधरही रहेंगे. पूरा ग्रूप मिलके पार्टी करेगा” तिने एकदा आदेशच सोडला. तरी शनिवारी मी निघणार होते तेव्हा तिने मला अडवूनच धरलं. मग त्या शनिवारी आम्ही सर्वजण पिक्चर बघायला गेलो. नंतर पबमध्ये थोडावेळ मस्ती केली आणि बाहेरच डिनर करून हॉस्टेलवर परत आलो. त्यासाठी आम्ही वॉर्डनकडून लेट नाईट परमिशन घेतली होती. लतिका तिच्या आत्याकडे गेली होती आणि मी काकूकडे. म्हणजे परमिशन फॉर्मवर तसं लिहिलं होतं.

पण माझं गावी जाणं नंतर हळूहळू कमी होत गेलं. कॉलेजमध्ये लेक्चर्स आणि लॅब सेशन्स वाढत गेले. असाईनमेंट्स, पॉवरपॉइंट प्रेझेंटेशन्स यात खूप वेळ जायचा. सीनीअर्सबरोबर आमचं तसं बरं

पटायचं, अधूनमधून खटके पण उडायचे. सीनीअर्सची खरी गरज भासायची ती नोट्ससाठी, पण मी या बाबतीत माझाच फंडा चालू ठेवला होता, आफताब-स्टाईलने आपल्या नॉट्स आपणच काढायच्या. कॉलेजमध्ये आल्यावर मी आईला जितकं मिस केलं तित्कंच माझ्या कंप्युटरलाही मिस केलं. इंटरनेट कॅफेमध्ये तासावर पैसे देऊन कंप्युटर वापरताना मला माझ्या रूममधला पीसी आठवायचा. माझ्या पीसीवर बसून मी सलग तीन चार तास गेम्स खेळायचे. क्वचित कधीतरी आफताब सोबत पिक्चर पाहणं व्हायचं. पण घर सोडून आल्यावर मला त्या पीसीचीच सर्वात जास्त आठवण यायची. दिवाळीला मी बाबाकडून लॅपटॉप घेतला.

आमच्या ग्रूपमधला सौरभ माझ्यामागे जरा जास्तच लागला होता. त्याचा सब्जेक्ट फिजिक्स होता, त्यामुळे एरवी कॉलेजमध्ये कधी दिसायचा नाही पण लायब्ररीमध्ये हमखास भेटायचा. काही मुलांना आपण फर मोठे सेक्स मॅग्नेट आहे आणि पोरी आपल्यावर बघताक्षणी फिदा होतात असा एक माज असतो. सौरभ त्यातलाच. दिसायला छान होता, स्टायलिशही होता, पण मला फारसा काही भावला नाही. सतत त्याचं ते किलर लूक्स द्यायचे प्रयत्न करणं फार बोर व्हायला लागलं. प्रत्यक्षात ते मला तरी डेस्पो वाटायला लागले. त्याला दूर लोटायला मी बराच प्रयत्न केला, पण तरी तो अधिकच चिपकायला लागला. मग मी शाणपणा करून अखिलशी मैत्री वाढवली. अखिल सुरूवातीला खूप शांत वाटला होता. फारसा कुणाशी बोलायचा नाही. त्याला आय आयटीला जायचं होतं म्हणून तो तयारी करत होता. दोनतीनदा त्याच्याबरोबर मूव्हीला वगैरे गेल्यावर स्पष्टपणे म्हणाला, “मला रीलॅक्सेशन हवंय. खूप अभ्यास करून ब्रेन थकतो” म्हणून.

हाड!! तोंडावर उत्तर दिलं त्याच्या. च्यायला, मी म्हणजे काय सेक्सटॉय वाटले का? मीच काय, कुठलीही मुलगी त्याला केवळ सेक्सटॉय म्हणून हवी होती. अभ्यासामध्ये लक्ष लागावं म्हणून. कसलीही कमिटमेंट नको. रिलेशनशिप नको. केवळ फिजिकल संबंध हवेत. म्हटलं मला शक्य नाही. सेक्सबद्दल मला काहीच प्रॉब्लेम नव्हता. सेफ सेक्स असेपर्यंत मला काही काळजी नव्हती. पण केवळ मज्जा म्हणून माझ्याच्याने शक्य झालं नस्तं. मला काय कुणासोबत डायरेक्ट लग्न करायचं नव्स्तं, पण रिलेशनशिपचं एक उबदार कुशन असतं त्याखेरीज केलेल्या सेक्सला काहीही अर्थ नसतो. मी केदारसोबत झोपले कारण, माझं केदारवर प्रेम होतं. अखिलसोबत झोपणार नाही कारण माझं त्याच्यावर प्रेम नाही. ही सर्व माझी तत्त्वं मी गुंडाळून वरच्या माळ्यावर फेकली ती फक्त आफताबसाठीच. आता नाही, पण नंतर!!

हल्ली माझं दर आठवड्याला घरी येणं थोडं कमी झालं होतं. कॉलेजमध्ये अभ्यासाचं वारं वहायला लागलं होतं. दर आठवड्याला एक टेस्ट व्हायची, आणि त्याचे मार्क फायनलला धरणार असं सांगितलं

होतं. शिवाय वीकेंडला लतिकाच्या ग्रूपसोबत काही ना काहीतरी प्लान्स ठरायचेच. गेल्या चार महिन्यात तर मी एकदाही घरी आले नव्हते. मी येणार म्हणून बाबानं फटाके उडवायचेच काय ते शिल्लक ठेवले होते. सकाळी घरी पोचले तेव्हापासून आईला किती बोलू नी काय असं झालं होतं. माझंच घर मला नवीन असल्यासारखी “इकडे ठेवलाय बघ साबण” म्हणून मला माझ्याच खोलीच्या बाथरूममध्ये सांगत होती. आई म्हणजे ना, आईच आहे!

घरी गेल्यावर सकाळ अख्खी मी झोपून काढली. आईनं जेवायला पुरणपोळ्या करेन असं सांगितलं होतं. माझा जीव पुरणपोळ्यांपेक्षा कटाच्या आमटीत जास्त अडकलेला. आई काळा मसाला घालून ती आमटी काय करते! आईनं साडेबारा वाजता हाका मारून मारून मला अखेर उठवलं. जाग आल्याआल्या घरामध्ये मसाल्याचा तो मस्त दरवळ पसरलेला जाणवला. “आईगं! आय लव्ह यु” मी आईच्या गळ्यात पडत म्हटलं.

“होय का? आता आई हवी झाली. चल आटप. भूक नाही लागली का?” मी तोंड वगैरे धुवून स्वयंपाक घरात आले तेव्हा आई पोळ्या लाटत होती. अचानक जोरजोरात भांडी फेकल्याचा आवाज ऐकू यायला लागला, आमच्या नव्हे शेजारच्या किचनमधून. घरात नूरी असेल, पण ती अशी भांडी का फेकत होती? दोन मिनिटांनी गडग्यावरून उडी मारून अझरभाई घरात आला.

“ये! गरम पोळ्या करतेय.” आई त्याला म्हणाली.

“कधी आलीस?” माझ्याकडे बघत त्यानं विचारलं. मी आपलं सकाळी आले, मग कॉलेज कसं चालू आहे वगैरे बोलत होतो, पण बाजूच्या किचनमधून येणारे भांड्यांचे आवाज काही थांबले नव्हते.

आईनं जादूला ताट वाढून दिलं. “काकी, स्वप्नीलला द्या की”

“दोनच पोळ्या झाल्यात. बाकीच्या झाल्या की तिलापण देते. तू जेव निवांत. आज काय पराक्रम केला?”

“अर्धा किलो गवारीच्या भाजीत अर्धा किलो मीठ” जादू पुरणपोळीच्या घासावर किंचित फुंकर मारत म्हणाला.

“म्हणजे?” मी न राहवून विचारलं.

“म्हणजे. अशी भाजी कढईमध्ये शिजत होती. त्यामध्ये अर्धा किलो मीठाची पिशवी अशी धरून ओतली. आमच्या बेगमसाहिबांनी” बोलताना जादूने हातातला घास खाली ठेवला.

“काहीही. असं कुणी कशाला करेल?” आफताब नूरीला वेडी म्हणायचा, पण नूरी खरंच मला तशी कधीच वाटली नाही.

“असंच काय, ती बरंच काही करते. एखाद्याला किती छ्ळायचं त्याला काही लिमिट असावं की नाही? बिचारा नवरा दमून कामावरून येतो, त्याला जेवायचं काही करत नाहीच. वर त्याने स्वतःहून काही करून घेतलं की त्यात असले घाणेरडे प्रकार करायचे” आई नूरीचा सगळा राग पोळीवर काढत असणार. पोळी अगदी टम्म फुगली होती. “सोन्यासारखा नवरा आहे. दिवसभर इकडेतिकडे राबतोय. घरात बाकीचं काही काम नाही. दोन वेळेला शिजवून वाढायचं तर आहे. तेही जमत नाही!” आईनं पोळीला पोळपाटावर आपटून तिच्यातली सर्व हवाच काढली. बोलायच्या नादांत आईनं बहुतेक साधीच पोळी केली होती. पुरण घालायचं विसरली! “हा इतका सांभाळून घेतो म्हणून इतकी शेफारलीये.”

आईनं तरी माझ्या पुढ्यात ताट आणून ठेवलं. “तूप घे गं” मला पुढची पोळी लाटत असताना आज्ञा केली. आता पुरण नसलेल्या पुरणपोळीवर तूप कशाला हवंय?

“भाई, तुला आईनं तूप वाढलंच नाही”

“मी खात नाही.” जादू सहज म्हणाला. “मला नको.”

आईनं परत तीच दोरी  पकडून पुढचा टाका घतला, “बरं, खायचे प्यायचे तरी काय नखरे आहेत का? पोळी भाजी आणि कोशींबीर. याहून दुसरं काही नको. भाजी फळं सगळं खरेदी करून आणतो. ही बाई घरामध्ये फळं अगदी कुजवून मग बाहेर टाकेल, पण त्यानं एक सफरचंद कापलं तरी असा अकांडतांडव करेल की बास्स” एकंदरीत नूरीचा आईला प्रच्ंड राग आलेला दिसत होता. जादूनं मात्र काही न बोलता जेवणं संपवलं. जितक्या सहजतेनं तो जेवायला घरी आला, आणि आईशी बोलत होता त्यावरून हे कदाचित रोजचंच असावं.

“काकी, संध्याकाळी सातनंतर येईन” ताट सिंकमध्ये ठेवून हात धुत तो म्हणाला. “काही आणायचंय?”

“भाजी आणू नकोस. यतिनने चिक्कार आणली आहे, पण जर त्या मारवाड्याच्या दुकानाकडून आलास तर मागे आणलीस ती बेसनाची मिठाई आण. स्वप्निलला आवडेल”

“चालेल, दुध दही आणू का? त्याच्याकडे चांगलं मिळतं”

“दही नको. पनीर आण. स्वप्निलसाठी पालकपनीर करेन. तुझ्यासाठी आलूपालक!”

“ओके. रात्री तुम्ही काही जास्त करू नका. दुपारचं तसं पण फार उरेलसं दिसतंय. रात्री मी काहीतरी लाईट बनवून आणेन..” आई आणि अझरभाई आरामात बोलत होते. मला त्यांच्या या डेली कामाची लिस्ट ऐकायला मजा येत होती. जादू जेवून निघून गेल्यावर आईनं परत नूरीपुराण चालू केलं.

“कैदाशीण आहे नुसती. त्याच्यातर जीवावर उठली आहे. एकदा अशीच माहेरी गेली. जाताना दारंखिडक्या बंद केल्या आणि गॅसचे दोन्ही नॉब चालू ठेवले. नशीब तो घरात आला आणि त्याला लगेच गॅसचा वास आला. नाहीतर काय झालं असतं.”

“पण मग तो कशाला सहन करतोय? सोडून द्यायचं ना...”

“मलाही तेच समजत नाही. याचा चांगुलपणा दरवेळी मध्ये येतो. मागे म्हटलं मी देऊन टाक काय तुमच्यात  तलाक असतो... तर म्हणे, असं करणं ठिक नाही. तिच्या घरचे पण यालाच दोष देतात. पण हिचे प्रकार रोज वाढतच चाललेत. तिला म्हणे याच्याशी लग्न करायचं नव्हतं. शाकाहारी नवरा तिला आवडत नाही. तो सिगरेट दारू पितो हे तिला आधी माहित नव्हतं.”

“आफताब मागे म्हणाला होता की तिला वेडाचे झटके येतात”

“वेडाचे झटके येणारी माणसं अशी वागत नाहीत. ही वेडाचं सोंग घेते. मुद्दाम छ्ळायला बघते. हे घर विकून चिक्कार पैसे येतील, मग फ्लॅट घेऊन राहू या म्हणून त्याच्या मागे लागताना कसे हिला वेडाचे झटके येत नाहीत. घर भाभींच्या नावावर होतं. त्यांच्या पश्चात अझर आणि आफताबच्या नावावर झालं, मग अझर एकटा कसा घर विकेल? तर आफताबला म्हणे, तू सही करून घर सोड.  अझरला म्हणे, तू परत दुबईला जा, तिथे बराच पैसा मिळेल, कशाला स्वतःच्या बिझनेसमध्ये इतके कष्ट घेतोयस? हे सर्व बोलताना हिला वेडाचे झटके येत नाहीत. त्याने डॉक्टरकडे जाऊया म्हटलं की हिचा धिंगाणा चालू. एकदा यानं फोन करून ॲम्ब्युलन्स बोलावली तर ती गाडी पोचायच्या आत ही नॉर्मलवर. मला सगळे नखरे समजतात. नवरा नकोय. दोन वर्षं बाहेर होता, तेव्हा धड राहिलीच की माहेरी. बिचारा इकडे परत काय आला, हिला अवदसा सुचली. माणसानं किती सहन करावं याला काही लिमिट? दया येते मला त्या आईविना लेकराची.”

अचानक त्या क्षणी लख्खकन जाणवलं. आई म्हणजे आता फक्त माझी आई नव्हती. अझर तिला मुलासारखा नव्हता, तर तिचा मुलगाच झाला होता. त्यांचं दोघांचंच अतिशय सुंदर निरागस आणि तितकंच हळवं नातं झालं होतं. आपल्याला भरपूर मुलं असावीत आपण त्यांचं कोडकौतुक करावं अशी आईची खूप इच्छा. पण झाले मी एकटीच. माझं काय कमी लाड केले नाहीत, पण मी मुंबईला गेल्यावर तिच्यासाठी अझर होता. त्यानं तर फार  लहानपणी आई गमावली. नंतर चाची गेल्या.

आफताब शिकायला लांब. या गावामध्ये परक्यासारखा एकटाच होता. नूरीच्या या तऱ्हेवाईक वागण्यानं दुखावलेल्या अझरला आईनं आपलं मानलं! मी आईला सोडून मुंबईला गेले हे तिला मनामध्ये फार खुपलं होतं, वरकरणी तिनं दाखवलं नव्हतं इतकंच. अझर आणि माझी आई दोघं म्हणजे एकाला झाकावा दुसऱ्याला काढावा. बाबाच्या चुका आई माफ करत गेली आणि नूरीचा दुष्टपणा अझर सांभाळत राहिला. नंतरही दोन दिवस जादू दुपारचा जेवायला आमच्याचकडे येत राहिला. संध्याकाळी कामावरून आल्यावर काहीतरी बनवून घरी घेऊन यायचा. त्या दिवशी स्वतः बनवलेले पोहे मला आणून दिले. "कावळ्याचिमण्यांसाठी वाटीभर पोहे" ठेवलेला अरिफ मला अख्खा दिवस आठवत राहिला. आज अरिफ असता तर... काही नाही तर नूरीला तरी त्यानं गप्प केलं असतंच.

आता एक्झाम जवळ येत चालली होती, प्रॅक्टीकल रीपीट चालू झाली होती. मी आफताबस्टाईलने माझ्या अभ्यासाचं टाईमटेबल बनवून घेतलं.या टाईमटेबलानुसार अभ्यास केला तर मला काहीच प्रॉब्लेम आला नसता. त्याची इंटर्नशिप संपली होती, त्याच्या फायनल परीक्षेचा अभ्यास भलत्याच तयारीनं चालू केला होता. लतिकाला एका मराठी जाहिरातीमध्ये रोल मिळाला होता. त्यामुळे ती भलतीच खुश होती. टीव्हीवर ऍड पहिल्यांदा आली तेव्हा अख्खं हॉस्टेल मेसमध्ये टीव्हीसमोर येऊन बसलं होतं. प्रत्यक्षात चार मुलींच्या गराड्यात लतिका कुठली अहे ते समजायच्या आत कोणतरी जाडी मराठी हिरॉइन आली आणि म्हणाली, "या मुली तुम्हाला हसतात तर तुम्ही लावा आमचं हे मसणं क्रीम. वगैरे वगैरे" तरीपण आम्ही सर्वांनी लतिकाचं जमके अभिनंदन वगैरे केलं. "ही तर सुरूवात असते गं, अशीच हळूहळू कामं मिळत जातात" रूमवर आल्यावर ती म्हणाली. मला त्यातलं काहीच माहित नसल्यानं मी केवळ मान डोलावली.

**क्रमशः**

**नंदिनी देसाई**